<u>इचलकरंजी महानगरपालिका</u>

**महिला व बालविकास विभाग**

**अंदाजपत्रकाकारीता दरपत्रक नोटीस**

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत महिलांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देऊन आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करणेच्या उद्देशाने शहरातील मुलींना व महिलांना १) लघुउद्योग प्रशिक्षण २) आत्याधुनिक माग ( विवर काम) चे प्रशिक्षण ३) ड्रायव्हींग (टु-व्हीलर व फोर व्हीलर) ४) ब्युटी पार्लर ५) इमिटेशन ज्वेलरी मेकींग ट्रेनिंग ६) बेकरी प्रॉडक्ट मेकिंग ट्रेनिंग इत्यादीचे प्रशिक्षण (अंदाजे ३० ते ६० लाभार्थी प्रति प्रशिक्षण ) देणे इत्यादी कामांची निविदा मार्गावणेत येणार आहे. याकामी अंदाजपत्रक /एस्टीमेट करणेकरीता प्रति लाभार्थी दरपत्रक मार्गावणेत येत आहे.सदरचे दरपत्रक दि. ११ /०१/२०२४ ते दि. १७ / ०१/२०२४ अखेर पर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागात स्विकारणेत येईल. प्राप्त दरपत्रक दि. १८ / ०१ / २०२४ दु. ४.०० वाजता उघडणेत येईल. याबाबतची सर्व अटी व शर्ती नोटीस बोर्डावर व महिला व बालकल्याण विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

दि. ११ /०१/२०२४

(तैमूर मुलाणी)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**
**महिला व बालविकास विभाग**

**महिलांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देऊन आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करणेच्या उद्देशाने शहरातील मुलींना व महिलांना प्रशिक्षण देणे.**

अटी / शर्ती-

१. प्रत्येक प्रशिक्षणचे दरपत्रक स्वतंत्र देणेत यावे.

२. प्रशिक्षणाचा पुर्ण कालावधी खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | प्रशिक्षण तपशिल | प्रशिक्षण देणे प्रति दिन | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | लघुउद्योग प्रशिक्षण | ३ तास | १५ दिवस |
| २ | अत्याधुनिक माग (विवर काम) | ३ तास | ४५ दिवस |
| ३ | ड्रायव्हींग (टु-व्हीलर ) | ३० मिनीट | १० दिवस |
| ४ | ड्रायव्हींग (फोर व्हीलर) | ४५ मिनीट | ३० दिवस |
| ५ | ब्युटी पार्लर | ३ तास | ३० दिवस |
| ६ | ईमिटेशन ज्वेलरी मेकींग ट्रेनिंग | ३ तास | १५ दिवस |
| ७ | बेकरी प्रॉडक्ट मेकिंग ट्रेनिंग | ३ तास | १५ दिवस |

**३. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सोबत देणे बंधनकार राहील.**

४. प्रत्येकी प्रशिक्षणामध्ये लाभार्थी संख्या ही ३० ते ६० इतकी असेल.

५. प्राप्त दरपत्रक मधील सर्वात कमी दाराचे दराच्या आधारे संबंधीत प्रशिक्षण कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत येईल. तद्नंतर निविदा प्रक्रिया राबविणेत येईल.

६. प्रशिक्षणसाठी आवश्यक साहित्य तसेच प्रशिक्षणाकरीता आवश्यक हॉल / गाळा हा निविदाधारकांनी पुरवठा करणे बंधनकारक राहील.

७. सर्व दर GST व इतर सर्व शासकीय करासह देणेत यावे.

८. संबंधीत प्रशिक्षणामधील ड्रायव्हींग प्रशिक्षणकरीता लाभार्थ्यांचे कच्चे लायसेन्स (Learning Licence) निविदाधारक यांनी देणे बंधनकारक राहील.

९. टु व्हीलर ड्रायव्हींग करीता ३० मिनीट ग्राऊंडवर प्रतिदिन व फोर व्हीलर करीता किमान ५ कि.मी. पर्यंत प्रतिदिन लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.

१०. उक्त प्रशिक्षणाबाबत तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन ( Lecture) देणे आवश्यक आहे.

११. संबंधीत प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर लाभार्थींना यांना प्रशिक्षण पुर्णत्वेबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत निविदाधारक स्वःखर्चाने यांनी देणे बंधनकारक राहील.

**(तैमूर मुलाणी)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with CamScanner